अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.८५/२०२३

जा.क्र उआ (सा.प्र.)/ आस्था/७९६२दि. २६/१०/२०२३

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/८५/२०२३

प्रति,

श्री.आनंद तुकाराम कुचेकर

स.नं.४, बंटर स्कूल जवळ, गाडीतळ

हडपसर, पुणे-४११०२८

यांस

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.आनंद तुकाराम कुचेकर , स.नं.४, बंटर स्कूल जवळ, गाडीतळ, हडपसर, पुणे-४११०२८ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.११/९/२०२३ रोजी (आ.क्र.९८३४, दि.११/०९/२०२३) अन्वये माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/७०७३, दि.०३/१०/२०२३ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ११/९/२०२३ | ११/०९/२०२३ | १०/१०/२०२३ | ०३/१०/२०२३ | ० |

अपिलार्थी यांनी "दिलेली माहिती चूकीची व दिशाभूल करणारी आहे' असे अर्जात नमूद करुन दि.१०/१०/२०२३ रोजी (आ.क्र.११४१४ दि.१०/१०/२०२३) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १०/१०/२०२३ | १०/१०/२०२३ | ९/११/२०२३ | होय | --- |

अपिल दिनांक १९/१०/२०२३ रोजी दुपारी ४.०० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी यांना दि.१८/१०/२०२३ सकाळी ११.३० वाजता दूरध्वनीवरुन सुनावणीस उपस्थित राहणेबाबत संपर्क साधला होता. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी यांनी "दिलेली माहिती चूकीची व दिशाभूल करणारी असून शासन निर्णयाचे चुकीचे पृथ्थकरण करुन विचारणा केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास हेतुपुरस्पर नकार दिलेला आहे" असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/७०७३, दि.०३/१०/२०२३ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दा | माहिती / उत्तर |
|---|---|---|
| १. | प्राथमिक शिक्षण विभागाकडील (तत्कालीन शिक्षण मंडळाकडील सेवक) लिपिक संवर्ग व कनिष्ठ अभियंता संवर्गातील कर्मचारी यांचे पदोन्नती व सेवाविषयक बाबींमध्ये निदर्शनास आलेल्या अनियमिततेबाबत आपले खात्यामार्फत /विभागामार्फत चौकशी चालू असल्यास अशा प्रकारे चौकशी सुरू असलेल्या कर्मचारी यांची संवर्गनिहाय संख्या उपलब्ध व्हावी (यापूर्वी खातेनिहाय चौकशी सुरु असलेले कर्मचारी वगळून) | सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. संकिर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, मंत्रालय मुंबई दि. १७/१०/२०१४ मधील तरतुदीनुसार शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्याच्या सेवानियमा अंतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल या सारखी वैयक्तिक तपशीला संबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकारावर नसल्याचा निर्णय स्पेशल लिव्ह पिटीशन क्र. २७७३४/२०१२ दि.३/१०/२०१२ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे.. |

खात्यामार्फत/विभागामार्फत चौकशी चालू असलेल्या कर्मचाऱ्यांची संवर्गनिहाय संख्या उपलब्ध व्हावी अशी मागणी असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. संवर्गनिहाय केवळ संख्यांची माहिती अपिलार्थी यांनी मागणी केली असल्याने ती उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांनी उत्तरात योग्य बदल करुन घेवून संवर्गनिहाय संख्या असलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी असे अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

# आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे, महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांना माहितीच्या उत्तरात योग्य बदल करुन संवर्गनिहाय संख्या उपलब्ध करुन द्यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.८५/२०२३ निकाली काढण्यात येत आहे.

25/10/23

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.